पान १ वरून

यंदा सरासरीच्या ९९ टक्के पाऊस

पावसाच्या अंदाजात ५ टक्के कमी अधिक होण्याची शक्यता आहे. पावसाचा अंदाज कमाल तापमान, सकाळ व दुपारची सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा ताशी वेग आणि सूर्यप्रकाशाचा कालावधी या निकषावर आधारित आहे.

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण अधिक राहील. कमी दिवसांत अधिक पाऊस आणि काही काळ पावसात मोठे खंड, असे हवामान राहील.

उष्ण, दमट हवामान राहणार

जूनदरम्यान, कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पाऊस, तसेच उष्ण व दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे.

विदर्भात सोसाट्याचा वारा वाहणार असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले.

अरुणाचलमध्ये भाजपला बहुमत...

समर्थन देणाऱ्या सिक्कीममधील मतदारांचेही मोदींनी आभार मानले.

अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपने सत्तेची हॅट्ट्रिक साधली आहे. येथे भाजपच्या ४६, तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन उमेदवारांना जनतेने निवडून दिले आहे. काँग्रेसला मात्र अवघ्या एका जागेवर समाधान मानावे लागले आहे. अरुणाचलमधील ६० पैकी १० जागा भाजपने बिनविरोध जिंकल्याने याठिकाणी ५० जागांसाठी मतदान झाले होते. विधानसभेचा निकाल ऐतिहासिक असून या विजयाची मालिका देशभर पसरले, अशी प्रतिक्रिया अरुणाचलचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी दिली. उल्लेखनीय बाब म्हणजे, याठिकाणी भाजपकडून रिंगणात असलेल्या चार महिला उमेदवारांनी देखील विजय मिळवला, परंतु राज्याचे शिक्षणमंत्री ताबा तेदीर यांना राष्ट्रवादीच्या उमेदवाराने पराभूत केले, ही बाब भाजपच्या यशाला गालबोट लावणारी ठरली आहे.

दुसरीकडे सिक्कीम विधानसभा निवडणुकीत एकूण ३२ जागांपैकी ३१ जागांवर बाजी मारत एसकेएम राज्यात सलग दुसऱ्यांदा सत्तेत आला आहे. सिक्कीममधील एसडीएफ या पक्षाला १ जागा मिळाली. मावळत्या विधानसभेत १२ आमदार असलेल्या भाजपला यंदा एकही जागा जिंकता आली नाही.

कोल्हापुरातील कळंबा कारागृहात..

सिद (रा. कवठेमहांकाळ), दीपक नेताजी खोत (रा. जत, जि. सांगली) या पाच जणांवर जुना राजवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कारागृहातील सुरक्षा रक्षक धीरज जगन्नाथ जाधव यांनी फिर्याद दिली आहे.

१९९३ साली मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटातील पाच कैदी कळंबा कारागृहात आजन्म कारावासाची शिक्षा भोगत आहेत. यातील मुन्ना ऊर्फ मनोजकुमार गुप्ता हा २८ सप्टेंबर २०१३ पासून कळंबा कारागृहात शिक्षा भोगत आहे. सर्कल नंबर दोनमध्ये इतर कैद्यांमध्ये त्याला ठेवण्यात आले होते. मुन्ना हा तापट व रागीट स्वभावाचा असल्यामुळे त्याचे इतर कैद्यांशी फारसे जुळत नव्हते. सतत काही ना काही वादावादीचे प्रकार घडत होते.

रविवार, २ जून २०२४ रोजी सकाळी ७.३० वाजता नेहमीप्रमाणे सर्व कैद्यांना अंघोळीसाठी बाहेर काढले होते. सर्कल दोन येथील पाण्याच्या हौदाजवळ मुन्ना ऊर्फ मनोजकुमार गुप्ता हा दगडावर बसून अंघोळ करत होता. यावेळी त्याच सर्कलमधील संशयित प्रतीक, बबलू, सौरभ, ऋतुराज, दीपक या पाच जणांनी ड्रेनेज टाकीवरील सिमेंटचे झाकण उपसून काढून ते झाकण मुन्ना ऊर्फ मनोजकुमार याच्या डोक्यात, चेहऱ्यावर, पाठीत, पोटावर, पायावर मारले. तीन ते चार वेळा झाकण डोक्यात आदळल्याने डोक्याचा चेंदामेंदा होऊन मुन्ना जागीच गतप्राण झाला.

कैद्यावर होणारा हल्ला पाहून इतर कैदी पळून गेले. सुरक्षा रक्षक शिंदे यांनी संशयित आरोपींना बाजूला करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी सुरक्षा रक्षकाला ढकलून दिले. त्यामुळे तो बाजूला पडला. कैद्याचा खून झाल्याची माहिती कारागृहात सर्वत्र पसरल्यानंतर प्रभारी अधीक्षक विवेक झेंडे व इतर अधिकारी त्या ठिकाणी आले. दरम्यान, जुना राजवाडा पोलिसांना फोन करून माहिती दिली. त्यामुळे पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे, उपनिरीक्षक गळवे आदींचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना या घटनेची माहिती दिली. त्यांच्या उपस्थितीत इन कॅमेरा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह सीपीआर रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला.

कारागृहाच्या सुरक्षेचा बोजवारा

कळंबा कारागृहात २०२३ मध्ये रुग्णालयात उपचार घेणाऱ्या कैद्याचा बादलीतून दगड नेऊन खून केला होता. त्यानंतर २०२४ मध्ये बॉम्बस्फोटातील कैद्याचा खून झाला. हाणामारी, मोबाईल, चार्जर, बॅटऱ्या सापडण्याचे प्रकार सातत्याने घडत असतात. यावरून कारागृहाच्या सुरक्षेचा बोजवारा उडाल्याचे दिसून येते.

अभिनेत्री रविना टंडन आणि...

होते. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, जमावातर्फे रॅश ड्रायव्हिंगचा करण्यात आलेला आरोप खोटा असल्याचे उघड झाले. त्यानंतर, मात्र हे प्रकरण मिटले. दोन्ही बाजूंनी तक्रार दाखल झाली नाही. तसेच, या प्रकरणी अभिनेत्री रविना टंडनकडून अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. या प्रकरणी तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ऑफर | घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी | ऑफर

APPOINTMENT

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

आता सवलतीच्या दरात

उत्तर महाराष्ट्र	रु. ५०००/-
मुंबईसह कोकण विभाग	रु. ५०००/-
मराठवाडा विभाग	रु. ५०००/-
पश्चिम महाराष्ट्र	रु. ५०००/-
विदर्भ	रु. ५०००/-
कोणतेही दोन विभाग	रु. ७५००/-
कोणतेही तीन विभाग	रु. ११५००/-
कोणतेही चार विभाग	रु. १५५००/-
संपुर्ण महाराष्ट्र	रु. १९५००/-

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२३ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा 18002081019

E-mail:customercare@sapp.in

सलमान खानच्या हत्येचा कट...

संख्या पाच झाली आहे. लॉरेन्स बिष्णोई व गोल्डी ब्रार गँगमधील आरोपींनी पाकिस्तानातून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे मागवून सलमान खानची हत्या करण्याचा कट रचल्याची माहिती मिळाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी सलमान खानच्या हत्येचा कट रचणाऱ्या लॉरेन्स बिष्णोई व गोल्डी ब्रार गँगमधील ४ आरोपींना नुकतीच अटक केली आहे. जॉनी वाल्मिकी हा हरयाणा येथील भिवानी भागात राहत असल्याची माहिती परिमंडळ-२ चे पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे यांनी भिवानी येथील पोलीस अधीक्षक वरुण सिंघला यांना दिली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलिसांचे पथक हरयाणा येथे दाखल झाल्यानंतर नवी मुंबई पोलिसांनी भिवानी क्राइम ब्रँचच्या मदतीने जानी वाल्मिकी याला शनिवारी ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपी जानी वाल्मिकी यास भिवानी न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला ५ जूनपर्यंत ट्रांझिट कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. नवी मुंबई पोलिसांचे पथक आरोपीस घेऊन पनवेल येथे परत येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल...

आत्मसमर्पणावेळी केजरीवाल यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुनीता, मुलगा पुलकित, मुलगी हर्षिता आणि अन्य आप नेते हेदेखील उपस्थित होते. तुरुंगाकडे निघण्यापूर्वी त्यांनी आपल्या लेकरांची गळाभेट घेतली आणि आई-वडिलांच्या पाया पडले. राजघाटस्थित महात्मा गांधींच्या समाधीवर आदराजंली अर्पण केली आणि कनॉप्ट प्लेसस्थित हनुमान मंदिरात पूजा-अर्चा केली. यानंतर ते आपच्या मुख्यालयात पोहोचले. याठिकाणी कार्यकर्त्यांना संबोधित करताना केजरीवाल यांनी आपण देश वाचवण्यासाठी तुरुंगात जात असल्याचे म्हटले. मी परत तुरुंगात जात आहे. भ्रष्टाचारामध्ये सहभागी होतो म्हणून मी जात नाही. तर हुकूमशाहीविरोधात आवाज बुलंद केल्यामुळे जात आहे, असे केजरीवाल म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने मला २१ दिवसांचा दिलासा दिला होता. हे दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय होते. या काळात एक मिनिट देखील मी वाया घालवले नाही. देशाला वाचवण्यासाठी निवडणुकीचा प्रचार केला. आप पक्ष महत्त्वपूर्ण नाही, तर देश प्रथम महत्त्वाचा असल्याचे केजरीवाल म्हणाले. तसेच भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचे सलग तिसऱ्यांदा सत्ता येण्याचे भाकित वर्तवणारे सर्व एक्झिट पोल बोगस असल्याचा दावा त्यांनी केला. ४ जून रोजी भाजप सरकार स्थापन करणार नाही. एक्झिट पोल हे नैराश्यात नेण्याचा खेळ असल्याचे केजरीवाल म्हणाले. आपने भावनिक संदेशासोबत केजरीवाल यांचे अखेरच्या क्षणातील कुटुंबासोबतचे छायाचित्र सोशल माध्यमावर टाकले. भारतमातचे वीर सुपुत्र अरविंद केजरीवाल यांनी लोकशाही वाचवण्यासाठी तुरुंगात जाण्यापूर्वी आपल्या आई-वडिलांचा आशीर्वाद घेतला आणि आपल्या लेकरांची गळाभेट घेतली. केजरीवाल हुकूमशाहीसमोर झुकणार नाहीत, असे आपने म्हटले.

लावणी सम्राज्ञी प्रमिला लोदगेकर यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

मोडनिंब : मुंबई येथील मेघा फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार यावर्षी लावणी सम्राज्ञी प्रमिला लोदगेकर सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आला. अंधेरी (मुंबई) येथील सिंटा थिएटर येथे मेघा फाउंडेशनच्या प्रमुख अनिशा यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रख्यात कथ्थक नर्तिका आदिती भागवत, पीटीआयचे माजी फोटो एडिटर शिरीष शेटे, गायक रूपकुमार राठोड, चित्रपट असोसिएशनच्या स्मिता ठाकरे, गायक सोनू निगम, गायक व अभिनेत्री सुचित्रा कृष्णमूर्ती, लोककलेचे जेष्ठ अभ्यास प्रा.डॉ.प्रकाश खांडगे तसेच लोककला अकादमीचे प्रमुख डॉ.गणेश चंदनशिवे, लोकरंगच्या अध्यक्षा शैला खांडगे आदी मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

मुंबईकरांनी सोडला सुटकेचा नि:श्वास !

मध्य रेल्वेवरील महामेगाब्लॉकमधून अखेर सुटका

मुंबई : तब्बल ६३ तासांचा महामेगाब्लॉक, उष्णतेचा झळा, स्थानकातील गर्दी आणि तीन दिवसांत दीड हजारांहून अधिक लोकल, मेल-एक्स्प्रेस सेवा रद्द यामधून मुंबईकरांची सुटका झाली आहे. मध्य रेल्वेने नियोजित वेळेपूर्वी आपली कामे युद्धपातळीवर पूर्ण करत रविवारी दुपारी १.१० वाजता सीएसएमटीहून टिटवाळ्यासाठी पहिली ट्रेन रवाना केली. यामुळे या महामेगाब्लॉकमुळे त्रासलेल्या मुंबईकरांनी रविवारी अखेर सुटकेचा निःश्वास सोडला.

ठाणे स्थानकातील फलाट क्र.५/६ च्या रुंदीकरणाचे काम तसेच सीएसएमटी स्थानकात २४ डब्यांच्या गाड्यांसाठी फलाट क्रमांक १०-११ च्या विस्तारीकरणासाठी मध्य रेल्वेकडून महामेगाब्लॉक घेण्यात आला होता. यामध्ये ठाणे स्थानकात ३१ मेच्या मध्यरात्रीपासून म्हणजे ००:३० वाजल्यापासून ठाणे येथे ६३ तासांचा ब्लॉक घेण्यात आला. तर सीएसएमटी येथे १ जूनच्या मध्यरात्रीपासून २ जूनच्या दुपारी १२.३० वाजेपर्यंत ३६ तासांचा ब्लॉक घेण्यात आला होता. यावेळी ठाणे आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-भायखळा मुख्य मार्ग आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-वडाळा रोड हार्बर मार्गावर मध्य रेल्वेकडून वाहतूक रद्द करण्यात आली होती. दरम्यान, या ब्लॉक काळात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक रामकरण यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संबंधित विभागांचे कर्मचारी, अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग काम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे.

सीएसएमटी स्थानकात आता २४ डबा गाड्यांचे फलाट

मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी, अभियंते, पर्यवेक्षक आणि कर्मचारी यांच्या टीमने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यशस्वीरीत्या पूर्ण केले. प्लॅटफॉर्म क्रमांक १० आणि ११ ची ३८५ मीटरने वाढ केल्यानंतर, आता लांबी ६९० मीटरपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे आता २४ डब्यांच्या प्रवासी गाड्या बसू शकणार आहेत. यासाठी तब्बल २५० कर्मचारी, अधिकारी, पर्यवेक्षक यांचा हातभार लागला. प्लॅटफॉर्मची लांबी वाढवण्याबरोबरच पॉइंट्स, सिग्नल्स, डीसी ट्रॅक सर्किट आणि इतर तांत्रिक कामेही करण्यात आली.

ठाणे स्थानकातील व्यस्त फलाटांवर प्रवाशांना मिळणार दिलासा

ठाणे स्थानकावरील प्लॅटफॉर्म ५/६ हे ३०० हून अधिक उपनगरी तसेच मेल/एक्स्प्रेस गाड्या हाताळणाऱ्या सर्वात व्यस्त प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. यामुळे हा फलाट रुंद करण्यासाठी १७१७१ मीटर, ०.५७१७१ मीटर आणि १.५७१७१ मीटरचे ७८५ प्रीकास्ट होलो ब्लॉक्स बसवून ५८७ मीटरच्या संपूर्ण लांबीसाठी २-३ मीटरने रुंदीकरण करण्यात आले.

प्लॅटफॉर्मच्या बांधकामासाठी अशा प्रकारच्या ब्लॉक्सचा वापर पहिल्यांदाच झाला. मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी आणि पर्यवेक्षकांच्या टीममध्ये प्रत्येक संघाचे नेतृत्व करणारे १५ वरिष्ठ विभाग अभियंते आणि १० विविध कंत्राटदारांच्या सुमारे ४०० मजुरांच्या २० संघांनी हे काम पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली.

बेस्ट बसगाड्यांमधील गर्दी घटली

मुंबई : गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेला जम्बो मेगाब्लॉक छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या प्लॅटफॉर्मचे विस्तारीकरण आणि ठाणे रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मची रुंदी वाढवण्याचे काम पूर्ण झाल्याने समाप्त झाला. रविवारी दुपारी १.१० वाजता पहिली लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून टिटवाळ्यासाठी रवाना झाली. यामुळे बेस्ट बसगाड्यांमधील गर्दी निवळली. सोमवारी सर्व लोकल त्यांच्या नियमित वेळेनुसार धावणार असल्याने बेस्टवरील ताण कमी होणार असून नागरिकांनादेखील दिलासा मिळणार आहे.

रविवारी बेस्ट प्रशासनाने वडाळा, भायखळा आणि सीएसएमटी रेल्वे स्थानकादरम्यान २२७ फेऱ्या चालवल्या. प्रत्येक फेरी मागे साधारणता ५३ प्रवाशांनी प्रवास केला. दुपारी १२ वाजेपर्यंत १२,०६७ प्रवाशांनी प्रवास केला. गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत प्रवाशांची संख्या घटल्याचे दिसले. रेल्वे सुरळीत सुरू झाल्याने बेस्ट प्रशासनाने अतिरिक्त बस गाड्या चालवणे थांबवले आहे. या ब्लॉकदरम्यान बेस्ट प्रशासनाने मुंबईकरांच्या सेवेसाठी जादा बसेस चालवल्या. एसटीनेही आपल्या काही बसगाड्या रस्त्यावर उतरवल्या होत्या. एसटीच्या जादा बसेस चालवूनही प्रवाशांच्या अडचणी कमी झाल्या नाहीत. १ जून रोजी रात्री ९.४५ वाजेपर्यंत बेस्ट परिवहनने वडाळा स्थानकातून १३२ फेऱ्या, भायखळा येथून १२५ फेऱ्या आणि सीएसएमटी येथून ९२ फेऱ्या करून प्रवाशांची वाहतूक केली. शुक्रवार, ३१ मे रोजी, २८,६०,०६७ प्रवाशांनी बेस्ट बसमधून प्रवास केला आणि त्यांना १,९२,३५,७२९ रुपयांचे उत्पन्न मिळाले. तर १ जून रोजी २७,३७,९७६ प्रवाशांनी प्रवास केला ज्यातून १,९९,७२,५८२ रुपयांचा महसूल बेस्टच्या तिजोरीत जमा झाला.

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत

शाखा कार्यालय : दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३

नियम ८ (६) ची तरतूद पाहा)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

समस्त जनतेला आणि विशेषत्वाने कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंकडे तारण/प्रभारात असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता, जी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रतीकात्मक ताब्यात** घेतली आहे, ती ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आधारावर खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसांची नावे, कर्ज खाते क्र.	काही असल्यास, ज्ञात भारासह प्रतिभूत मत्तेचा तपशील	थकीत रक्कम	आरक्षित मूल्य / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	अनिल किसनराव तळेकर (ऋणको) गीतांजली अनिल तळेकर (सहऋणको) कर्ज खाते क्र. एनएचएडीआर ०००००१०४२१६७	फ्लॅट क्र. २०६, मधुबन रेसिडेन्सी आणि गुरुनगाव रो-हाऊस बंगलो, वडारवाडी, प्लॉट क्र. १, स. क्र. २ ए/४ बी, भिंगार कॅम्प, अहमदनगर, अहमदनगर-४१४ ००२	रु. २१,८४,७५२/- ३० मे २०२४	रु. ११,२५,०००/- / रु. १,१२,५००/-	०१ जुलै २०२४ स. ११.०० वा. ते दु. ०३.०० वा.	१० जुलै २०२४ दु. ०२.०० वा. ते दु. ०३.०० वा.

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी **ग्लोब टेक**च्या संकेतस्थळावर (URL Link-https://BestAuctionDeal.com) वर करण्यात येईल. गहाणदार/सूचना पाठविलेले यांना **०९ जुलै २०२४ रोजी सायं. ०५.०० वा.** पूर्वी पुढील व्याजासह संपूर्ण थकबाकी चुकती करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, अन्यथा सदर तारण मालमत्तेची परिशिष्टानुसार विक्री करण्यात येईल.

प्रस्तावित बोलीदारांनी इसारा रक्कम ठेव आरटीजीएस/धनाकर्ष (डीडी) (रकाना ई पाहा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३** येथे **०९ जुलै २०२४** रोजी किंवा तत्पूर्वी **दु. ०४.०० वा.** पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्या की, प्रस्तावित बोलीदार त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळाद्वारे सादर करू शकत नसतील तर निविदा दस्तावेजाची स्वाक्षरित प्रत उपरोक्त नमूद वेळेनुसार **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३** येथे **०९ जुलै २०२४** रोजी किंवा तत्पूर्वी **सायं. ०५.०० वा.** पूर्वी सादर करू शकतील. इसारा रक्कम ठेव धनाकर्ष (डीडी) ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.-ऑक्शन**'' यांच्या नावे **अहमदनगर** येथे देय स्वरूपात राष्ट्रीयीकृत/अनुसूचित बँकेकडील असावा.

निरीक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरणासंबंधित अधिक स्पष्टीकरणासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांना **९९२०८०७३००** वर किंवा आमच्या सेल्स आणि मार्केटिंग पार्टनर **नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांना संपर्क करा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही पुढील कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली निरस्त करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया संकेतस्थळ https://www.icicihfc.com/ वर भेट द्या.

दिनांक : ०३ जून २०२४ | **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : अहमदनगर | **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

महाराष्ट्र शासन

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

www.dvet.gov.in; desk7@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

जाहिरात

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सर्व शासकीय / खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया २०२४ दिनांक ०३/०६/२०२४ पासून सुरु करण्यात येत आहे. इच्छुक उमेदवारांनी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरावेत. सदर अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० जून, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यासाठीची प्रवेश प्रक्रियेसंबंधीची व प्रमाणित कार्यपध्दतीची माहिती पुस्तिका Online स्वरुपात https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अर्ज स्विकृती, विकल्प सादर करणे व प्रवेशप्रक्रियेचे विविध टप्पे इत्यादी प्रक्रियेबाबत समुपदेशन सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दररोज आयोजित करण्यांत येत आहे. माहितीपुस्तिकेत नमूद असलेल्या टप्प्याप्रमाणेच प्रवेशप्रक्रिया राबविण्यांत येणार असून त्यासंदर्भातील वेळापत्रक तसेच राज्यातील शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थात उपलब्ध असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे संकेतस्थळावर www.dvet.gov.in व https://admission.dvet.gov.in, प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय व सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-: प्रवेशाचे वेळापत्रक :-

अ.क्र.	प्रवेश प्रक्रियेचा तपशील	प्रारंभ दिनांक	अंतिम दिनांक
१.०	ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे		
१.१	ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज शुल्क जमा करणे.	०३ जून, २०२४ स. ११.०० वाजेपासून	३० जून, २०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत.
२.०	प्रवेश अर्ज निश्चित करणे		
२.१.	अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत) मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज निश्चित (Confirmation) करणे.	०५ जून, २०२४ स. ११.०० वाजेपासून	०१ जुलै, २०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत.

स्थळ :- मुंबई | -Sd-

दिनांक :- ०३/०६/२०२४ | (दि. अं. दळवी)

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/क्र.५/C-७० | संचालक

जीएस महानगर को-ऑप.बँक लि. (शेड्यूल्ड बँक)

प्रशासकीय कार्यालय :-तळमजला, हिरामणी सुपर मार्केट बिल्डींग,डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई-400012.

फोन नं. - (022) 68860826 /68860837, Email - recovery@mahanagarbank.com

-: टेंडर (विक्री) नोटीस :-

कमर्शियल / रेसिडेन्सीयल प्रॉपर्टी (मिळकत) आहे त्या स्थितीत विकणे आहे. सदर प्रॉपर्टी (मिळकत) सिक्युरिटरायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ॲक्ट फायनान्शीयल असेट्स ॲड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 चा नियम 8 अन्वये ताब्यात घेतली आहे. खाली वर्णन केलेल्या मिळकतीची/मालमत्तेची टेंडर पध्दतीने **"जेथे आहे जसे आहे तसे"** या तत्वावर विक्री करण्यात येत आहे.

(रक्कम रु.लाखात)

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	शाखा, कर्ज खाते क्र. व येणेबाकी रक्कम	मालमत्ता (प्रॉपर्टी) चे वर्णन	रिजर्व प्राईस	अनामत 10 %
1	**मे.विजय अडसुरे कन्ट्रक्शन** (प्रोपा. श्री. विजय जगन्नाथ अडसुरे) **जामिनदार:-** 1) श्री. सचिन हरीकांत वाघुमबरे 2) मे. तुषार सेल्स ॲण्ड सर्विस 3) श्री. रविंद्र जगन्नाथ अडसुरे 4) सौ. शितल छाया जाधव	नागापूर EMIHYP-16 ODCC-103 (एकूण येणेबाकी रु.2,32,18,434/- दि.30.09.2018 अखेर व पुढील व्याज व इतर खर्च)	1) एन.ए. जमीन प्लॉट नं.03, क्षेत्र 210 स्वे.मीटर, प्लॉट नं.24, क्षेत्र 200 स्वे.मीटर, प्लॉट नं.23 क्षेत्र 180 स्वे.मी सर्वे नं. 95/2B (जुना सर्वे.नं. 105/2B) नवनागापूर, अहमदनगर.	114.28	11.43
			2) सर्वे .नं. 94/3 (जुना सर्वे नं. 104 / 3) , त्यावरील एन.ए.जमीन प्लॉट नं.14P , क्षेत्र 160 स्वे.मीटर, नवनागापूर, अहमदनगर.	27.89	2.79
			3) सर्वे नं.94/3 (जुना सर्वे नं.104/3) त्यावरील निवासी इमारत, एन.ए.जमीन प्लॉट नं.42P, क्षेत्र 102.145 स्वे.मीटर. बांधकाम क्षेत्र 120.93 स्वे.मीटर , नवनागापूर, अहमदनगर	21.77	2.17
			4) एन.ए.जमीन प्लॉट नं.01 ,क्षेत्र 210 स्वे.मीटर , सवै.नं.95/2B (जुना सर्वे. नं. 105/2 B) व एन.ए.जमीन, प्लॉट नं.02, क्षेत्र 180 स्वे.मीटर, सवै .नं. 95/2B (जुना सर्वे. नं. 105 /2B) नवनागापूर, अहमदनगर.	89.10	8.91
			5) एन.ए.जमीन प्लॉट नं.21 ,क्षेत्र.110 स्वे.मीटर, एकुण क्षेत्र 302.25 स्वे.मीटर रो हाऊस, बांधकाम क्षेत्र 60 स्वे. मीटर, सर्वे नं. 94/1B (जुना सवै.नं. 104/1B) नवनागापूर, अहमदनगर.	21.88	2.18
			6) एन.ए.जमीन प्लॉट नं. 21, क्षेत्र 72 स्वे.मीटर,एकूण क्षेत्र 302.25 स्वे.मीटर, रो हाऊस, बांधकाम क्षेत्र 50 स्वे.मीटर,सर्वे.नं.94/1B (जुना सर्वे नं.104/ 1B) नवनागापुर,ता. जि. अहमदनगर	15.37	1.53
			7) एन.ए.जमीन प्लॉट नं.22,क्षेत्र 94.77 स्वे.मीटर एकूण क्षेत्र 302.25 स्वे,मीटर ,रो हाऊस,बांधकाम क्षेत्र 60 स्वे.मीटर सर्वे नं.94/1B (जुना सर्वे नं.104/1B) नवनागापूर, अहमदनगर.	19.66	1.96
			8) एन.ए.जमीन प्लॉट नं.22,क्षेत्र 65स्वे.मीटर,एकूण क्षेत्र 302.25 स्वे.मीटर,रोहाऊस, बांधकाम क्षेत्र 50 स्वे.मीटर, सर्वे नं.94 /1B (जुना सर्वे नं.104/ 1B),नवनागापूर, अहमदनगर.	14.36	1.43
2	**श्री.शरद संपतराव पवार जामिनदार :-** 1) मे. विजय अडसुरे कन्ट्रक्शन (प्रो. श्री. विजय जगन्नाथ अडसुरे 2) मे. हॉटेल प्रणव (प्रो. बाबासाहेब गणपत जगताप)	नागापूर PRLOAN-03 (एकूण येणेबाकी रु.78,04,305/- दि.31.10.2018 अखेर व पुढील व्याज व इतर खर्च)	1) एन.ए.जमीन प्लॉट नं.01,क्षेत्र 93.25 स्क्वे. मीटर, सर्वे नं.46/2अ (जुना सर्वे नं. सर्वे नं. 56/2A,एम.आय.डि.सी जवळ, नागापुर, ता. व जि.अहमदनगर.	42.15	4.21
			2) एन.ए जमीन प्लॉट नं. 02, क्षेत्र 89.38 स्क्वे.मीटर,सर्वे नं.46/2अ (जुना सर्वे नं. सर्वे नं. 56/2A,एम.आय.